## वेचक | वेधक

### ‘मनमंथन’चे ६ रोजी पणजीत प्रकाशन



**डिचोली :** येथील साधना पांडुरंग आरोंदेकर यांच्या दुसऱ्या ‘मनमंथन’ काव्यसंग्रहाचे प्रकाशन शुक्रवार ६ मार्च रोजी कला संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांच्या हस्ते पणजी कार्यालयात होणार आहे. यावेळी दैनिक नावप्रभाचे माजी संपादक सुरेश वाळवे, संगम भोसले, प्रकाशक पांडुरंग आरोंदेकर, कवयित्री साधना आरोंदेकर हे उपस्थित असतील. ‘मनमंथन’ या संग्रहाला वाळवे यांची प्रस्तावना लाभली आहे. या काव्यसंग्रहात गझल हा प्रकार हाताळला असून ५० कवितांचा समावेश आहे.

### पर्ये सातेरी ब्राह्मणीचा उद्या वर्धापनदिन

**केरी-सत्तरी :** घोल, सावंतवाडा - पर्ये येथील श्री सातेरी ब्राह्मणीमायाचा वर्धापनदिन ५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त दुपारी १२ वाजता आरती, दुपारी २ वाजता महाप्रसाद, रात्री १० वाजता दशावतारी नाट्यप्रयोग सादर करण्यात येणार आहे, असे देवस्थान समितीतर्फे कळविण्यात आले आहे.

### सविता तारी यांना कटू अनुभव : विश्वासार्हतेबाबत प्रश्नचिन्ह

# वाहतूक संचालनालयाच्या ग्राहक सेवेचा लोकांना फटका

प्रतिनिधी | गोवन वार्ता

**पणजी :** वाहतूक संचालनालयात ग्राहकांसाठी विविध सेवांसाठी खास ग्राहक सेवा केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्रामुळे लोकांना तत्काळ सेवा देण्याचा उद्देश खात्याचा असला तरी या सेवा केंद्रातून लोकांना फसवले तर जात नसेल, असा संशय घेण्याची वेळ आली आहे. हडफडे येथील सविता आनंद तारी यांना आलेल्या अनुभवातून या केंद्राची विश्वासार्हताच प्रश्नचिन्हात सापडली आहे.

या प्रकरणी सविता आनंद तारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी जुन्ता हाऊस येथील वाहतूक संचालनालय कार्यालयात अखिल गोवा पर्यटन परमीट (एजीटी) नूतनीकरणासाठी १३ नोव्हेंबर २०१९ रोजी विहीत अर्ज सादर केला. यावेळी कार्यालयाकडून परमीट तयार झाल्यानंतर त्यांना फोनवरून




किंवा संदेश पाठवून माहिती दिली जाईल, असे सांगण्यात आले. बरेच दिवस फोन किंवा संदेश न आल्यामुळे परमीट तयार झाले का ते पाहण्यासाठी त्यांनी कार्यालयाकडे संपर्क साधला असता, हे परमीट २१ नोव्हेंबर २०१९ रोजी तयार झाल्याची नोंद संगणकात असल्याचे आढळून आले. ठरावीक वेळेत परमीट घेतले नाही तर दंड भरावा लागतो.

दरम्यान, परमीट घेण्यासाठी २ जानेवारी २०२० रोजी वाहतूक कार्यालयात गेले असता तिथे परमीट घेण्यासाठीची मुदत संपल्याने दोन हजार रुपये दंड भरण्याचा आदेश देण्यात आला. यासंबंधी परमीट तयार झाल्याचा कोणताही फोन किंवा संदेश पोहचला नाही, असे सांगितले असता त्यांचे काहीही म्हणणे ऐकून न घेता दंड भरावाच लागेल, अशी सक्ती करण्यात आली.

या प्रकरणी सविता तारी यांनी ६ जानेवारी २०२० रोजी लिखित तक्रार दाखल करून ही चूक ग्राहक सेवा केंद्राची असल्याने दंड माफ करण्यात यावा, अशी विनंती करण्यात आली. या लिखित तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक वाहतूक संचालक फ्रान्सिस्को वाझ यांनी पत्र पाठवून ही चूक

**ग्राहक सेवा केंद्राचे कामकाज संगणकद्वारे निश्चित केले जात असेल तर त्यासंबंधीचे पुरावे असणे गरजेचे आहे. एवढे करून हे पुरावे दाखवण्याबाबत आढेवेढे का घेतले जातात, असा सवाल सविता तारी यांनी केला. अशा पद्धतीने लोकांकडून दंड वसुली करून महसुलाचा एक नवा स्रोत वाहतूक खात्याने सुरू केला नाही ना, असाही उपरोधिक प्रश्न केला जात आहे.**

अर्जदाराची असल्याचे सांगून दंड भरावाच लागेल, असे स्पष्ट केले आहे. दरम्यान, आपला मोबाईल तपासून बघा किंवा केंद्राकडे आपल्याला फोन केल्याचा किंवा संदेश पाठविल्याचा पुरावा दाखवल्यास आपण दंड भरू, असे सांगूनही त्याकडे वाहतूक संचालनालय लक्ष देत नाही, अशी तक्रार तारी यांनी केली आहे.

# मये केळबाय देवस्थानच्या कळसोत्सवाचा मार्ग मोकळा

## गोवा खंडपीठाकडून अंतरिम आदेश जारी

प्रतिनिधी | गोवन वार्ता

**पणजी :** मये गावातील देवी माया केळबाय देवस्थानचा कळसोत्सव साजरा करण्यास डिचोलीच्या उपजिल्हाधिकारी ज्योती कुमारी यांनी घातलेली स्थगिती उठवून उत्सव साजरा करण्याची मोकळीक मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने दिली आहे.

याबाबत खंडपीठाने मंगळवारी अंतरिम आदेश जारी केला आहे. याव्यतिरिक्त नाईक गावकर आणि परब गावकर यांनी उत्सव अति महत्त्वाचा असल्याचे लक्षात ठेवून संयम आणि शांततेत उत्सव पार पाडण्यावर भर द्यावी, असा निर्देशही खंडपीठाने दिला आहे.

या प्रकरणाची पुढील सुनावणी १६ रोजी होणार आहे. दरम्यान, वार्षिक नियोजनाप्रमाणे यंदा हा उत्सव २८ फेब्रुवारी ते ७ मार्चदरम्यान साजरा होणे अपेक्षित आहे.

या प्रकरणी मये येथील देवी माया केळबाय देवस्थानचे व्यवस्थापकीय समितीतर्फे प्रवीण परब यांनी खंडपीठात याचिका दाखल केली आहे. या प्रकरणी डिचोली उपजिल्हाधिकारी, डिचोली मामलेदार तथा देवस्थान प्रशासक, हरी नाईक गावकर आणि डिचोली पोलिस स्थानकाचे प्रमुख यांना प्रतिवादी करण्यात आले आहे.

या याचिकेत डिचोली उपजिल्हाधिकारी ज्योती कुमारी यांनी आदेश जारी करून देवस्थानचे कळसोत्सव स्थगित ठेवण्यासाठी जारी केलेल्या आदेशाला आव्हान दिले आहे. या प्रकरणी मंगळवारी सुनावणी झाली असता, देवस्थान प्रशासनाने दिलेल्या आदेशाला प्रशासकीय लवादाकडे एक महिन्याच्या आत आव्हान देणार असल्याची माहिती नाईक गावकर यांच्यातर्फे वकिलाने खंडपीठात दिली. तसेच परब गावकर यांच्याबरोबर नाईक गावकर मानकऱ्यांना कळस गाड कुटुंबियांच्या डोक्यावर देऊन उत्सवाची सुरुवात होते, अशी माहिती नाईक गावकर यांच्यातर्फे मांडण्यात आली. तसेच देवस्थान प्रशासनाने दिलेल्या आदेशात नाईक गावकर यांना सहभागी होण्याचा अधिकार देण्यात आल्याचा मुद्दा नाईक गावकर कुटुंबियांनी खंडपीठात मांडला. या प्रकरणी देवस्थान प्रशासनाने उत्सवास नाईक गावकर यांना सहभाग होण्यास मंजुरी दिली आहे. याच्या अर्थ त्यांनी कळस गाड कुटुंबियांच्या डोक्यावर देणे होत नसल्याचा मुद्दा याचिकादाराने खंडपीठात मांडला. खंडपीठाने दोन्ही पक्षांची आणि सरकारची बाजू ऐकून घेतल्यानंतर वरील अंतरिम आदेश जारी केला. तसेच देवस्थान प्रशासनाच्या आदेशाला आक्षेप असल्यास संबंधितांनी प्रशासक लवादाकडे दाद मागण्याची मोकळीक देण्यात आली आहे.

### कार्यकर्ते, नागरिकांशी चर्चा



भारतीय जनता पक्षाच्या पणजी येथील कार्यालयात मंगळवारी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी कार्यकर्ते, नागरिकांशी संवाद साधला. यावेळी महिला पदाधिकारी कुंदा चोडणकर उपस्थित होत्या.

# गोव्यातील मद्य व्यवसाय संपवायचा आहे का?

## आमदार विजय सरदेसाईंचा सवाल; राज्यातील बार, रेस्टॉरंटवर गंडांतर शक्य

प्रतिनिधी | गोवन वार्ता

**मडगाव :** गोव्यातील मद्य व्यवसाय आणि पर्यायाने येथील पर्यटन नष्ट करण्याचे सरकारचे मनसुबे आहेत का, असा खोचक सवाल गोवा फॉरवर्डचे आमदार विजय सरदेसाई यांनी उपस्थित केला आहे. अर्थसंकल्पात गोव्यातील मद्य करात सुचवलेली वाढ दिल्लीतील मद्य व्यवसायाच्या पथ्यावर पडणार आहे, यामुळे गोव्यातील बार व रेस्टॉरंटवर गंडांतर येणार, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

मद्यावरील अबकारी कर त्वरित मागे घेण्याची मागणी करताना,



सरदेसाई यांनी दिल्लीहून गोव्यात येणारे पर्यटक मद्याचे वाढीव दर पाहून पाठ फिरवतील, अशी भीती व्यक्त केली आहे. कारण गोव्यातील मद्याचे दर देशाच्या राजधानीत उपलब्ध दराएवढेच असतील, असेही त्यांनी सांगितले.

सध्या गोव्यातील मद्य व्यवसाय गोमंतकीयांच्या हाती आहे. परंतु, एप्रिल महिन्यापासून करवाढ केल्यास त्याचे परिणाम येथील पर्यटनावर होतील. गोवा सरकार स्थानिक राजकारणी चालवत आहेत की दिल्लीतील नेते, असा प्रश्न सरदेसाई यांनी उपस्थित केला.

गोव्यात पर्यटक येण्यामागील एक कारण म्हणजे येथे चांगल्या प्रतीचे मद्य कमी दरात उपलब्ध आहे. परंतु, दिशाहीन सरकार मोजक्याच अतिरिक्त करासाठी येथील मद्य व्यवसाय आणि पर्यायाने पर्यटन नष्ट करण्यावर ठाम आहे, असा आरोप आमदार सरदेसाई यांनी केला.

बार व रेस्टॉरंट मालकांनी आपल्या घामाच्या आणि कष्टाच्या पैशातून व्यवसायासाठी जागा खरेदी केलेली आहे. मोठ्या जागेवर अधिक कर, हा नियम कोणत्या निकषावर लावण्यात आला, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. करवाढीपूर्वी संबंधितांना विश्वासात घेऊन, त्यांच्याशी चर्चा करणे आवश्यक होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### गोव्याला शाकाहारी बनवण्याची तयारी!

सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यानंतर महामार्गाच्या क्षेत्रात येणाऱ्या मद्यालयांना वाचवण्यासाठी गत सरकारने उचललेल्या पावलामागे आपली मोलाची भूमिका होती. मद्यालयांचा शहरी भागात समावेश करून त्यांना अभय देण्यात आले होते. स्थानिक व्यावसायिकांना संरक्षण देण्याची इच्छा सरकारकडे आवश्यक आहे. विद्यमान सरकार गोव्याला 'शाकाहारी' राज्य बनवण्याच्या तयारीत आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

# कचऱ्याची उचल त्वरित करा : दाजी साळकर

## स्वातंत्र्यपथावरील झाडांकडे लक्ष द्या, मॉन्सूनपूर्व कामांना वेग देणे आवश्यक

प्रतिनिधी | गोवन वार्ता

**वास्को :** स्वातंत्र्यपथावर लावण्यात आलेली झाडे जगविण्यासाठी मुरगाव पालिकेने लक्ष द्यावे, कचऱ्याची उचल त्वरित करावी, पावसाळ्यात डेंग्यूचा फैलाव होऊ नये यासाठी आतापासून खबरदारी घ्यावी, मॉन्सूनपूर्व कामाला वेग द्यावा, अशा मागण्या नगरसेवक कृष्णा (दाजी) साळकर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत केल्या. याप्रसंगी नगरसेविका रोचना बोरकर व सतीश च्यारी उपस्थित होते.

आठ महिन्यांपूर्वी स्वातंत्र्य पथावर झाडे लावण्यात आली होती. परंतु त्यांना पाणी घालण्यात येत नसल्याने ती करपली आहेत. पालिकेकडे



पत्रकार परिषदेत बोलताना कृष्णा (दाजी) साळकर. बाजूस सतीश च्यारी व रोचना बोरकर.

पाणी शिंपण्यासाठी कामगारच नाही, ही आश्चर्याची गोष्ट आहे. ती झाडे जगविण्यासाठी पालिकेने लक्ष देण्याची गरज साळकर यांनी व्यक्त केली. पालिकेकडे पाणी शिंपण्यासाठी पाईपच नाही. एक पाईप आम्ही दिला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शहरातील कचऱ्याची उचल होत नसल्याने सगळीकडे कचरा दिसत आहे. सडा येथील कचरा प्रक्रिया प्रकल्पामध्ये जागा नसल्याने कचरा उचल होत नसल्याचे उत्तर पालिकेकडून मिळते, असे त्यांनी सांगितले. सर्व पंचवीसही नगरसेवकांनी एकत्र येऊन कचऱ्याचा प्रश्न सोडविण्याची गरज आहे.

मॉन्सूनपूर्व कामाला अद्याप आरंभ झाला नसल्याचा दावा त्यांनी केला. गतवर्षी गटार नीट न उपसल्याने मोठी समस्या निर्माण झाली होती. त्यामुळे या प्रकरणी नगराध्यक्षांनी लक्ष घालण्याची गरज आहे. येथील काही झाडे उन्मळून पडण्याची शक्यता आहे, ती कापण्याची किंवा त्यांच्या फांद्या कापण्याची गरज आहे. तसेच काही इमारती जुन्या झाल्याने त्या कधी कोसळून पडतील हे सांगता येत नाही. यासाठी त्या इमारती पाडण्यासाठी मुरगाव पालिकेने पुढाकार घेण्याची गरज साळकर यांनी व्यक्त केली.

डेंग्यू होऊ नये यासाठी औषधांची फवारणी तसेच नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पालिकेकडे एक धूर फवारणी मशीन आहे. पालिकेने इतर संस्था तसेच आपल्याकडे असलेले मशीन घेऊन धूर फवारणी करण्यास पुढाकार घ्यावा, असे आवाहन साळकर यांनी केले. त्यांनी पालिकेला कचरा, धूर फवारणीसंबंधी लक्ष्य केले. येथील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात यावे, अशी विनंती आमदार कार्लुस आल्मेदा यांना केल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वास्कोत काहीच विकास झाला नसल्याचा दावा त्यांनी केला.

### नायक यांच्या पुस्तकाचे ७ रोजी प्रकाशन

**पणजी :** दै. लोकमतचे संपादक राजू नायक यांच्या ‘सुशेगाद’ या मराठीतील पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवारी (दि. ७) सायं ५.१५ वा. पणजीत डेल्मॉन हॉटेलच्या परिषद सभागृहात आयोजित केला आहे.

नायक यांचे हे आठवे पुस्तक आहे. गोमंतकीय संस्कृतीच्या उद्भव आणि विस्ताराची विविधांगांनी चिकित्सा करणाऱ्या या पुस्तकातील लेखांतून लेखकाने ऐतिहासिक परिपक्ष्यातून ख्रिश्चन, सारस्वत आणि अन्य समाजांच्या योगदानाचाही विश्लेषणात्मक परामर्श घेतलेला आहे. यावेळी अतिथी म्हणून माजी केंद्रीय कायदामंत्री ॲड. रमाकांत खलप, सुप्रसिद्ध उद्योजक आणि साहित्यिक दत्ता दामोदर नायक, सांशोधक व साहित्यिक प्रा. पराग पोरोब यांची उपस्थिती असेल, असे कळविण्यात आले आहे.

# ‘एफडीए’ने पणन मंडळाच्या अधिकाऱ्यांवर छापे मारावे!

## आमदार सुदिन ढवळीकर यांचा सल्ला

प्रतिनिधी | गोवन वार्ता



**पणजी :** अन्न आणि औषध प्रशासनाने (एफडीए) किरकोळ फळ विक्रेत्यांसोबत त्यांना फळांचे वितरण करणाऱ्या पणन मंडळाच्या अधिकाऱ्यांवरही छापे मारावे, अशी मागणी आमदार सुदिन ढवळीकर यांनी मंगळवारी पत्रकारांशी बोलताना केली.

एफडीएने म्हापसा आणि पणजी येथील किरकोळ फळ विक्रेत्यांवर छापे घालून त्यांच्याकडून रासायनिक प्रक्रिया केलेली फळे जप्त केली. एफडीएची ही मोहीम स्वागतार्हच आहे. पण किरकोळ फळ विक्रेत्यांना फळे पणन मंडळाकडून वितरित होत असतात. त्यामुळे एफडीएने पणन मंडळाच्या अधिकाऱ्यांवर छापा मारला तर यातील ‘मोठे मासे’ गळाला लागू शकतात, असे ढवळीकर म्हणाले.

रासायनिक प्रक्रिया केलेल्या फळांची मानवी आरोग्याला मोठा धोका असतो. त्यामुळे अनेकांचे आयुष्यही उद्ध्वस्त झालेले आहे. त्यामुळे एफडीएने गोव्यात फळे घेऊन येणाऱ्या ट्रकांचीही वारंवार तपासणी केली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

# आर्ट ऑफ लिव्हिंगचा गोमंतकीयांना होणार लाभ

## राजकुमार कामत यांची माहिती : यंदा २४० अभ्यासक्रम होणार सुरू

प्रतिनिधी | गोवन वार्ता

**पणजी :** जगभरात शांतता प्रस्थापित करण्यासाठी तसेच प्रत्येकाला आनंद मिळावा यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंग ही संस्था कार्यरत आहे. भारतासह १५६ देशांमध्ये या संस्थेचे कार्य सुरू आहे. आर्ट ऑफ लिव्हिंग संस्था गोव्यात जे कार्यक्रम आयोजित करत आहेत, त्याचा जास्तीत जास्त गोमंतकीयांना लाभ व्हावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आर्ट ऑफ लिव्हिंगचे सदस्य राजकुमार कामत यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

यावेळी प्रसिद्ध पार्श्वगायिका हेमा सरदेसाई, निरू सिंग यांचीही उपस्थिती होती. श्री श्री श्री रविशंकर यांनी स्थापन केलेल्या या संस्थेचे सर्व देशांत अनुयायी आहेत. पाकिस्तान, इराण या देशांत सुद्धा या संस्थेचे कार्य सुरू आहे. मन:शांती तसेच आनंद मिळविण्यासाठी हे अभ्यासक्रम तसेच कार्यक्रमांचा उपयोग



पत्रकार परिषदेत माहिती देताना प्रसिद्ध पार्श्वगायिका हेमा सरदेसाई. बाजूस आर्ट ऑफ लिव्हिंगचे कार्यकर्ते राजकुमार कामत, निरू सिंग व इतर.

होतो. लहान मुले, विद्यार्थी, पालक, उद्योजक यांच्यासाठी हा अभ्यासक्रम आहे. गेल्या वर्षी गोव्यात १६३ असे कार्यक्रम तसेच अभ्यासक्रम सुरू होते. याचा २०२० जणांना लाभ झाला. यंदा २४० अभ्यासक्रम सुरू होणार आहेत. त्याचा लाभ ४८०० जणांना मिळणार आहे, अशी आशा यावेळी व्यक्त करण्यात आली.

उत्कर्ष योग, मेधा योग, नो युवर चाईल्ड, हॅपिनेस प्रोग्राम, मेडिटेशन कोर्स, योगा फॉर कॉर्पोरेट, स्ट्रेस फ्री एक्झाम, सहज समाधी मेडिटेशन नॅचरल फार्मिंग, वेलनेस प्रोग्राम असे अभ्यासक्रम आर्ट ऑफ लिव्हिंग संस्था सुरू करणार आहे. यात ६८ प्रशिक्षित शिक्षक मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

# दक्षिण आशिया शहर परिषद उद्या

## अखिल भारतीय स्वराज संस्थेतर्फे दोनापावल येथे आयोजन

प्रतिनिधी | गोवन वार्ता

**पणजी :** अखिल भारतीय स्वराज संस्थेतर्फे ५ आणि ६ मार्च रोजी पणजीत दक्षिण आशियाई शहर परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे. गुरुवार ५ रोजी हॉटेल सिदाद द गोवा येथे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन होणार आहे. प्रदूषण, कचऱ्याची समस्या या विषयांवर परिषदेत चर्चा होणार आहे.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज संस्थेचे महासचिव राजू अगरवाल यांनी मंगळवारी पणजीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी संस्थेचे उपसंचालक रविरंजन गुरू, अशोक वानखेडे उपस्थित होते. या परिषदेच्या पार्श्वभूमीवर बुधवार ४ रोजी महिलांच्या विकासाविषयी दिवसभर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महिला आणि बाल कल्याण खात्याच्या संचालक दीपाली नायक, सुलक्षणा सावंत, संयुक्त राष्ट्र संघाच्या माजी सचिव लक्ष्मी पुरी यांचा या कार्यक्रमात सहभाग असणार आहे.

गुरुवार ५ रोजी हॉटेल सिदाद द गोवा येथे सकाळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी पणजीचे महापौर उदय मडकईकर उपस्थित राहणार आहेत. परिषदेसाठी २३० शहरातील ५०० प्रतिनिधी सहभागी होतील. त्याशिवाय २७ देशांतील मान्यवरही येतील. विविध शहरांचे ७५ महापौर तसेच तज्ज्ञ परिषदेत सहभागी होणार आहेत. राज्यातील ५० प्रतिनिधींचा यात सहभाग असेल.

### ४५ सत्रांमध्ये ६५ वक्त्यांचा सहभाग

पर्यावरण, शहरातील समस्या यावर उपाय शोधण्यासाठी ही परिषद महत्त्वाची आहे, असे अशोक वानखेडे यांनी यावेळी सांगितले. या परिषदेत लहान, मोठी मिळून ४५ सत्रे होणार आहेत. ६५ वक्त्यांचा या सत्रांत सहभाग असेल. अखिल भारतीय स्वराज संस्थेला यंदा ९५ वर्षे पूर्ण होत आहेत. यापूर्वी इतर शहरांमध्ये ही परिषद झाली आहे. गोव्यात अशी परिषद पहिल्यांदाच होत आहे.